स्थायी समितीच्या **मंगवार दिनांक 31–05–2016** रोजी **सकाळी 11–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **3.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| **4.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **5.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **6.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| **7.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| **8.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| **9.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| **10.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **11.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **12.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **13.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| **14.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **2.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. प्रमोद भुसारी, अति. उपायुक्त

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 161</u>:— प्रभाग क्र. 52 अ अंतर्गत झेंडा चौक धरमपेठ ते साकेत अपार्टमेंट पर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामास्तव रु. 46,32,994/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 162</u>:— प्रभाग क्र. 37 ब, मधील सेंट्रल एव्हेन्यु रोड ते शास्त्रीनगर शिवाजी चौक, हिवरीनगर येथील पोहोच मार्गाचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेस्तव प्राप्त एकूण 5 निविदांपैकी मे. फोनिक्स इंजिनीअरींग यांची प्राकलनीय राशीपेक्षा 3.5 टक्के ने अधिक दराची रु. 40,25,707/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 163</u>:— शैक्षणिक सत्र 2016—17 मधे नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधून इयत्ता 1 ते 8 मध्ये एकूण 21835 विद्यार्थी शिक्षण घेत आहे. केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान मोफत गणवेश योजने अंतर्गत यापैकी एकूण 13690 विद्यार्थी पात्र आहेत. यामध्ये इयत्ता 1 ते 8 मधील सर्व विद्यार्थीनी व अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. उर्वरित 8145 इतर मागास वर्ग व खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश या योजनेत नाही.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत पात्र असलेल्या एकूण 13690 विद्यार्थ्यांकरिता प्रती विद्यार्थी 02 गणवेशाकरिता रू. 400/— प्रमाणे अनुदान राशी सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त होत असते. सर्व शिक्षा अभियानांतर्गत पात्र नसलेल्या उर्वरित 8145 विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करण्याकरिता मनपा निधितून राशी देणे आहे. तसेच मनपाच्या शाळेतील नर्सरी KG-I, KG-II मधे शिक्षण घेणाऱ्या एकूण 1320 विद्यार्थ्यांच्या गणवेशाकरिता सुद्धा मनपा निधितून राशी देणे आहे

शैक्षणिक सत्र 2016—17 मधे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे गणवेश उपलब्ध करण्याकरिता मा. सभापती, शिक्षण समिती यांचेद्वारे गणवेशाचा रंग व कापडाची गुणपत्ता निश्चित करण्यात आली असून गणवेश पुरवठा मुदतीच्या आंत करण्याकरिता एकूण 07 एजंसींची निवड करण्यात आलेली आहे. तसेच गणवेशाच्या कापडाचे व शिलाईचे दर देखिल निश्चित करण्यात आलेले आहे.

निश्चित करण्यात आलेल्या एजंसीची नावे व ठरविण्यात आलेले दर खालीलप्रमाणे

1) संधू क्रियेशन, नागपूर
2) विन्टेक्स यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था मर्या. नागपूर
3) आर. के. ट्रेडर्स, नागपूर
4) स्टार युनिफॉर्म, नागपूर
5) पोद्दार सेल्स कॉर्पोरेशन, नागपूर
6) काईट्स ॲण्ड सन्स, नागपूर
7) प्रिया गारमेंट, नागपूर

| गणवेशाचे विवरण | दोन गणवेशाकरीता | | |
|---|---|---|---|
| | बाजार मुल्य | सर्व शिक्षा अभियान अनुदान | वाटाघाटीत निश्चित करण्यात आलेले दर |
| 1) वर्ग 1 ते 4 मुलांकरिता (हाफ शर्ट, हाफ पॅन्ट) | 463/— | 400/— | रू. 430/— |
| 2) वर्ग 1 ते 4 मुलींकरिता (हाफ शर्ट व टयुनिक) | 489/— | 400/— | रू. 450/— |
| 3) वर्ग 5 ते 8 मुलांकरिता (हाफ शर्ट व फुलपॅन्ट) | 572.50/— | 400/— | रू. 550/— |
| 4) वर्ग 5 ते 8 मुलींकरिता (सलवार कुर्ता, ओढणी) | 603.60/— | 400/— | रू. 600/— |

विद्यार्थ्यांची संख्या व ठरविण्यात आलेले दर यानुसार गणवेशावर एकूण रू. 1,17,01,680/— एवढा खर्च अपेक्षित असून यापैकी 13,690 विद्यार्थ्यांच्या रू. 400/— प्रती विद्यार्थी 02 गणवेशप्रमाणे रू. 54,76,000/— राशीचे अनुदान सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त होणार आहे.

उर्वरित इयत्ता 1 ते 8 मधील इतर मागासवर्ग व खुल्या संवर्गातील एकूण 8145 विद्यार्थी (मुले), नर्सरी के.जी.—1 के.जी.—2 या इयत्तेमध्ये शिकणारे 1320 विद्यार्थी तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकरिता 02 गणवेश प्रती विद्यार्थी रू. 400/— यानुसार प्राप्त होणारी रक्कम व वाटाघाटी अंतर्गत निश्चित करण्यात आलेले दरानुसार फरकाची रक्कम असे एकूण रू. 62,25,680/— एवढा खर्च मनपास करावयाचा आहे.

गणवेशाचा पुरवठा करण्याकरिता वरील 07 एजंसी नियुक्त करण्याकरिता तसेच गणवेशाचे कापड व शिलाई याकरिता वाटाघाटी अंतर्गत निश्चित करण्यात आलेले दरास व याकरिता येणारा एकूण खर्च रू. 62,25,680/— च्या खर्चास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 164</u>:— प्रभाग क्रं. ६२ अ अंतर्गत महालक्ष्मी नगर येथील प्रोसेस मंगल कार्यालय ते श्री. पराते ते श्री. रोकडे ते श्री. तिनखेडे व रामभाऊ म्हाळगीनगर येथील बालाजी रेस्टॉरेन्ट ते श्री. कनाटे ते श्री. तितरमारे यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. २९,७४,४४२/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 165</u>:— प्रभाग क्र. ४१ महाल येथील राजपथ चौक ते मातंगपूरा चौकापर्यंत सिमेंट रोडचे बांधकामाबाबत पुढील प्रश्न समितीने विचारात घेऊन,

१) एकुण रू. १,०३,५६,६६५/— रक्कमेच्या सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

२) स्थापत्य कामाचे रू. ३८,३२,८८३/— रकमेचे उर्वरीत कार्यादेश मंजूर निविदा दराने निविदाकार मे. एम. आर. ढोबळे यांना मंजूर निविदा दराने निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 166</u>:— मोक्षधाम अंतिमसंस्कार घाटावर अंतिमसंस्कार केंन्द्रात 30 मी.चिमणीचे आर. सी. सी. फाऊंडेशनसह उभारणी व इतर कामे करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. दिप कंस्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 1.07 टक्के अधिक दराची निविदा रूपये 26,28,366/– (रूपये सव्विस लक्ष अठ्ठाविस हजार तिनशे सहाष्ट रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक 405

(A43501271706) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 167</u>:— प्रभाग क्र. 72 क, विमानतळ अंतर्गत मातंग मोहल्ला ते दाते ले—आऊट पुलापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में आर बी. केवलरमानी हयांची मुळ प्राकलनीय 53,67,386/— दरापेक्षा 23.77 टक्के कमी दराची निविदा रूपये 40,91,558/—( रूपये चाळीस लक्ष एक्यानऊ हजार पाचशे अठ्ठावन रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 168</u>:— आरोग्य विभागाच्या सर्व झोन, हिवताप व हत्तीरोग तसेच इतर विभागासाठी खालील नमूद किटकनाशक साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा मागवून दोन वर्षासाठी दरकरार करण्यात येईल.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | बाजार दरानुसार | झोन तर्फे वर्ष 2016—17 ची मागणी | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | न्युऑन 76 '' EC | 800/— | 500 लिटर | 4,00,000/— |
| 2 | पायरोसीन आईल | 690/— | 1200 लिटर | 8,28,000/— |
| 3 | टेमीगार्ड 50% | 1450/— | 800 लिटर | 11,60,000/— |
| 4 | फ्लॉयगॉन | 850/— | 500 लिटर | 4,25,000/— |
| 5 | Bacullis Thurungsies Israelensis B.I.T. H-14 in Aquesos Suspension Approvel and Recommend by NUBDCP/TAC | 1525/— | 1000 लिटर | 15,25,000/— |
| 6 | Aquatain T.M.F./Green-B | 4950/— | 200 लिटर | 9,90,000/— |
| 7 | Phenyle Black-Grade 1 | 125/— | 5000 लिटर | 6,25,000/— |
| 8 | Citronila oil | 800/— | 400 लिटर | 3,20,000/— |
| 9 | Lakshya (Deltamethrin 1.25 U.LV) | 2300/— | 300 लिटर | 6,90,000/— |
| 10 | lkc.k 125 gm | 25/— | 8000 नग | 2,00,000/— |
| 11 | Pyrethrum 2% Extract | 2200/— | 150 लिटर | 3,30,000/— |
| 12 | Bi- Larv (Diflubenzuron 25%W.P.) | 5500/— | 150 किलो | 8,25,000/— |
| 13 | Neemtex | 925/— | 1000 लिटर | 9,25,000/— |
| **एकुण रक्कम** | | | | **92,43,000/—** |

नमूद वरिल खरेदीवर वार्षीक रु. ९२,४३,०००/— खर्च अपेक्षीत राहील. हा खर्च पद क्रं ६०६ (A४४२०१२७२२०२)व २०६ (A२३१०१२२२७०२) किंवा इतर पदा मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 169</u>:— प्रभाग क्र. ५२ मधील शंकरनगर येथील शंकरनगर पार्क ते श्री. पाटील व श्री. नेने ते श्री. करपाटे यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. २९,९९,८२०/— प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 170</u>:— प्रभाग क्र. ३७ अ व ब पडोळेनगर व हिवरी ले—आऊट येथे १) शंकर मेश्राम ते वाठोडा रोड, २) एम.आय.जी.कॉलोनी ते लोहाना भवन ३) श्री. चव्हाण ते श्री. नाकाडे व ४) श्री. तांबेकर ते श्री. काळे यांचे घरापर्यंत डांबरीकरण करण्यास्तव रू. २९,९८,०९६/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330803 मधून आर्थिक वर्ष २०१५–१६ मध्ये रु. १५.०० लक्ष प्रती नगरसेवक राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 171</u>:– प्रभाग क्र. 64 ब अंतर्गत अयोध्यानगर, श्रीरामवाडी, जम्मुदीपनगर, उदयनगर, महालक्ष्मीनगर व सच्चिदानंद नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 49,93,380/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 172</u>:– प्रभाग क्र. 32 ब, भाऊराव नगर येथे प्ले स्कूल कॉन्व्हेंट ते श्री. मदान यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 42,27,035/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A22001330802 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 173</u>:– प्रभाग क्र. 32 ब, सतनामी नगर येथे श्री. टांक ते श्री. पटेल यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 40,01,729/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A22001330802 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 174</u>:– प्रभाग क्र. ३१ ब, मस्कासाथ, येथील पाठराबे मोहल्ला तीन नल चौक, खापरीपुरा इत्यादी ठिकाणी सी.सी. पेव्हमेंटच्या कामाकरिता रु. २९,९९,९७०/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन **प्रभाग क्र. 31 ब ऐवजी 31 अ या दुरुस्तीसह** विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 175</u>:– प्रभाग क्र. ३२ ब अंतर्गत क्वेटा कॉलोनी येथील लिटील स्टार कॉन्व्हेंट ते भुखंड क्र. १३१ पर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव रु. ३२,१३,०४८/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 176</u>:– इतवारी दहीबाजार रेल्वे उड्डाणपुलाचे रेल्वे स्टेशन कडील स्लीप रोड रेल्वे विभागाच्या जागेतून अस्तित्वातील रेल्वे विभागाचे कंपाउन्ड भिंत व गेट तोडुन तयार करण्यात आल्याने रेल्वे विभागाची नविन कंपाउन्ड वॉल, गेट व स्लीप रोड करिता पादचारी मार्ग इत्यादी तयार करण्याकरीता रू. २५,१८,६९५/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय

मंजुरी प्रदान करणे तथा पद क्र. A४०२००४४०७०१ अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 177</u>:— प्रभाग क्र. ३२ अ व ब येथे श्री. पटेल यांचे घरापासुन ते जय सिताराम अपार्टमेंट ते लाईफ केअर हॉस्पिटल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. २९,९७,६८६/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A२२००१३३०८०३ मधून आर्थिक वर्ष २०१६—१७ मध्ये रु. १५.०० लक्ष प्रती नगरसेवक राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 178</u>:— प्रभाग क्र. ३२ ब क्वेटा कॉलोनी येथे श्री. खुराना ते मीना निवास पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. २८,१४,५०८/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A२२००१३३०८०२ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 179</u>:— प्रभाग क्र. ४७ (ब) नेहरूनगर येथील रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या रू. ३०,२६,२९०/— रकमेच्या निविदेस स्थायी समिती ठराव क्र. ५९३ दिनांक ०१.०२.२०१६ अन्वये प्राप्त मंजुरीचे अनुषंगाने मे. डी.सी. गुरूबक्षाणी यांना कार्यादेश क्र. ११०/RD दि. २५.०२.२०१६ निर्गमित करण्यात आला.

मात्र, मंध्यतरीचे काळात उपरोलिखीत रस्त्यापैकी काही रस्त्यावर शासन अनुदानातुन (नगरोत्थान प्रकल्पा अंतर्गत) डांबरीकरणाची कामे करण्यात आल्यामूळे त्या रस्त्याऐवजी, याच प्रभागातील मा. नगरसेविका यांनी सुचविल्याप्रमाणे त्रिशताब्दी बालोद्यान समोरील (आदीशक्ती मंदीर समोरील) व नेहरू नगर झोन मागील (देशी दारू दुकान ते सुदामपुरी मैदान) येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरिता मौका बदलाच्या प्रस्तावास मंजूरी देणे व निर्गमित कार्यादेशाचे राशीचे आत हे काम मे. डी.सी. गुरूबक्षाणी कडुन करून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 180</u>:— प्रभाग क्र. ३२ अ क्वेटा कॉलोनी येथे श्री. ठुकेजा ते कंधारी निवास जानकी भवन पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. ३६,४२,७८६/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A२२००१३३०८०२ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 181</u>:— प्रभाग क्र. ३२ अ सतरंजीपूरा येथील तेलीपुरा, मुसलमानपूरा व किराडपूरा येथे विविध ठिकाणी भुमिगत पाईप लाईन टाकण्याचे काम करण्यास्तव रु. ३९,५४,१९८/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A४३९०१३७१९१३ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 182</u>:— प्रभाग क्र. 42 अ महाल येथे राहतेकरवाडी पुलापासून ते मांतगपूरा पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या **रू. 29,99,660/—** रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 679 व नविन पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 183</u>:— प्रभाग क्र. 42 ब किल्ला येथे भोसला विहार कॉलनी मध्ये डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या **रू. 29,99,902/—** रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 184</u>:— हिंगणा टी पॉईन्ट ते सरकार नगर घाट पर्यंत Revamping & Refurbishment of Trunk Sewer line चे बांधकाम करण्याकरिता एकुण एकमेव प्राप्त निविदा मे. तापी प्रिस्ट्रेस प्रा.लि. यांची मुळ प्राकलनीय राशी रुपये 8,72,54,958/— दरापेक्षा 27.1 टक्के अधिक दराची रुपये 11,09,01,059/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा तसेच खालील अटी व शर्तींना मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अटी व शर्ती :—

1. या कामाकरिता काम करते वेळी कोणत्याही ईमारत प्रापर्टीला नुकसान होणार नाही याची दखल घेवून काम करण्यात यावे. आणि जर इमारत प्रापर्टीला धोका झाल्यास याची संपूर्ण खर्च वहन करण्याची जबाबदारी मे. तापी प्रिस्ट्रेस प्रा. लि. ची राहील. संपूर्ण दाव्याचा भुगतान कंत्राटदार मे. तापी प्रिस्ट्रेस प्रा.लि. करेल. नागपूर महानगरपालिका या खर्चा करिता जबाबदार राहणार नाही.
2. या करिता लागणारी मशीनरी आणि उत्तम तांत्रीक व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन काम करावे. जेणेकरुन कोणतेही आजू बाजूचे इमारतीला धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी.
3. सर्व वर्कींग ड्राईंग काम सुरु होण्या पूर्वी मा. मुख्य अभियंता याची मंजूरी घेण्यात यावी.

4. सर्व मुख्य लाईनचे लेवल व लाईन इनव्हर्ट लेवल नकाशांना मा. मुख्य अभियंता यांची काम सुरु करण्याच्या अगोदर मंजुरी घेण्यात यावी.
5. म.न.पा. द्वारे या कामा करिता प्रयत्न NABL मान्य अशा एजेन्सी द्वारे कामाची गुणवत्ता कंत्राटदाराच्या खर्चाने करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन रु. 11,09,01,059/— एवढया रक्कमेचे कार्यादेश देण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 185** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिति यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

अति. उपायुक्त
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर